# प्रेसनोट दि. २२/०६/२०१९

सिंहगडरोड पोलीस स्टेशन पुणे

सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत वडगाव मार्शल कर्मचारी सचिन तुपसौंदर व सुहास मोरे यांनी सर्तक डयुटी करुन केली उत्कृष्ट कामगिरी

---

दि. २१/०६/२०१९ रोजी सचिन भारत तुपसौंदर, पो.शि. ८७४४ व पो.शि. १०११४ सुहास मोरे, सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे यांना वडगाव मार्शलवर दिवसपाळी कर्तव्यावर पेट्रोलींग करीत असताना सायंकाळी १७.३५ वा. चे सुमारास विश्रांतीनगर, एच.डी.एफ.सी बँकेजवळ, विठ्ठलवाडी भागात सार्वजनीक रस्त्यावर एक इसम हातामध्ये चॉपर घेवुन फिरत असलेबाबत पोलीस नियंत्रण कक्ष, पुणे शहर यांच्याकडुन वॉकीटॉकीवर संदेश प्राप्त झाल्याने त्यांनी सदरबाबतची माहिती वडगाव पोलीस चौकी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक व्ही.जे.महांगडे यांना फोनव्दारे कळवुन तात्काळ सदर ठिकाणी सायंकाळी १७.४० वा. चे सुमारास पोहचले असता त्या ठिकाणी एक इसम आपल्या उजव्या हातामध्ये चॉपर घेवुन पायी फिरत असताना दिसल्याने त्याचे हातामधील चॉपर तसेच त्याला लगेचच ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव संदिप दत्तात्रय पवार, वय ४२ वर्षे, रा. सर्व्हे नं. २४/५/३, विश्रांतीनगर बिल्डींग नं. १, फ्लॅट नं. ए/२, विठ्ठलवाडी, पुणे असे असल्याचे सांगीतले. त्यास सिंहगडरोड पो.स्टे. येथे आणुन त्याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशा प्रकारे इसम नामे संदिप दत्तात्रय पवार, वय ४२ वर्षे, रा. सर्व्हे नं. २४/५/३, विश्रांतीनगर बिल्डींग नं. १, फ्लॅट नं. ए/२, विठ्ठलवाडी, पुणे याने अनाधिकाराने बेकायदेशीररीत्या चॉपर जवळ बाळगलेला असताना मिळुन आल्याने मा. पोलीस सह आयुक्त सो. यांचे आदेशाने पुणे शहरात शस्त्र, लाठया, काठया, वापरण्यास बंदी आदेश असताना त्याचा भंग केला म्हणुन सदर इसमांचे विरुध्द आर्म ॲक्ट कलम ४ (२५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यास दाखल गुन्हयात अटक करुन पोलीस उप-निरीक्षक व्ही.जे.महांगडे व वडगाव मार्शलचे पोलीस कर्मचारी पो.शि. ८७४४ सचिन तुपसौंदर व पो.शि. १०११४ सुहास मोरे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.